दै. मराठवाडा नेता दि 17/06/2022

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या

## एका पिस्टलसह पाच जिवंत काडतूस जप्त; एकास अटक

**नांदेड/प्रतिनिधी**

सध्या शहरात शस्त्र बाळगणाऱ्यांची धरपकड सुरू आहे. पोलिस इतक्या मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा जप्त करताना दिसून येत आहे. असेच दि.१५ जून रोजी रात्री मालेगाव रोडवरील शिव रोड कॉर्नर येथे दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांपैकी एकाला भाग्यनगर पोलिसांनी पकडले. मात्र अंधाराचा फायदा घेत अन्य चार आरोपी फरार झाले आहेत. या कारवाईत आरोपीकडून एका पिस्टलसह पाच जिवंत काडतूस जप्त करण्यात आली आहे. दरम्यान अटक करण्यात आलेल्या आरोपीस २० जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

जिल्ह्यात खून, दरोडे, मारामाऱ्या अशा घटनांत वाढ झाली आहे. महिन्याभरात किमान



चार ते पाच खुनाच्या घटनाची नोंद पोलिस ठाण्यात होत आहेत. कि रकोळ कारणावरून झालेल्या भांडणातही आरोपीकडून सर्रासपणे शस्त्रांचा वापर होताना दिसत आहे. त्यात बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांची भरदिवसा हत्त्या झाल्यामुळे नागरिकांत दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपीकडे नेमके हे शस्त्र येतातरी कुठून, हा प्रश्न अद्यापतरी अनुत्तरीत आहे. गेल्या दीड-दोन महिन्यात अनेक गुन्हेगारांना पोलिसांनी शस्त्रासह पकडले आहे. तर दरोड्याच्या तयारीत असलेल्या चार ते पाच टोळया शस्त्रासह पकडण्यात आल्या आहेत.

दरम्यान दि.१५ जून रोजीच्या रात्रीही पाचजण सशस्त्र दरोडा टाकण्याच्या तयारीत होते. सदर बाबीची भाग्यनगर पोलिसांना खबर लागताच रात्री ८.३०च्या सुमारास शहराजवळील खंडोबा चौक ते मालेगाव रोडवरील शिवरोड कॉर्नरजवळील पुलाजवळ पाचजण दरोड्याच्या तयारीत असताना, पोलिसांनी मोठ्या शिताफीने यातील रवीलाला उर्फ रवी नारायणसिंग ठकूर रा. जूना कोठा यास ताब्यात घेतले. तर त्याचा साथीदार आनंद यादवसह अन्य तिघेजण पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलिसांनी रवी ठाकूर याच्याकडून एक पिस्टल, पाच जिवंत काडतूसे, एक दुचाकी असा एकूण ६७ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान याप्रकरणी भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक सुधाकर आडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि किनगे हे अधिक तपास करीत आहेत.

दरम्यान मागच्या आठवड्यातच परभणी येथील हळद विक्री करून जात असलेल्या पिकअप वाहनाला मालेगाव शिवारात अडवून जवळपास पाच लाख रूपयाची रोख रक्कम लुटल्याची घटना घडली होती. हे प्रकरण ताजे असताना अशाप्रकारे सशस्त्र दरोड्याच्या तयारी असलेल्या टोळीतील एकाला ताब्यात घेतल्याने पुन्हा एकदा परीसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान पोलिस या प्रकरणातील फरार आरोपींचा शोध घेत आहेत.

दै सत्यप्रभा दि 17-06-2022

# पिस्तूल, काडतूसासह दोघांना अटक

## रोड्याचा कट पोलिसांनी उधळला : तिघांचे पलायन

नांदेड, दि. १६ - सशस्त्र दरोडा ...ण्याच्या प्रयत्नातील दोन अट्टल ...ना पोलिसांनी अटक केली तर ...जण पळून जाण्यात यशस्वी झाले. ...क करण्यात आलेल्या दोघांकडून ...तूल आणि जीवंत काडतूस व ...रसायकल जप्त करण्यात आली ...हे. ही कारवाई बुधवारी (दि.१५) ... साडेआठच्या सुमारास शिवनगर ...परास खंडोबा चौक भागात करण्यात ...ली.

गेल्या काही दिवसांपासून पोलीस ...क्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) चंद्रसेन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शहरासह जिल्ह्यात पोलिसांनी रात्रीची गस्त मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. भाग्यनगर पोलिसांची बुधवारी रात्री गस्त सुरु असताना त्यांना मिळालेल्या माहितीवरून तरोडा खुर्द परिसरातील खंडोबा चौक भागात शीव रोडवर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या दोघांना अटक केली. पोलीस दिसताच अंधाराचा फायदा घेऊन तिघेजण घटनास्थळावरून पसार झाले. << पान दोनवर

एस. ढेंबरे यांनी काम पाहिले.

## पिस्तूल, काडतूसासह...

पोलिसांनी रवी नारायणसिंग ठाकूर उर्फ लाला (वय ३२) आणि आनंद यादव (वय २३, दोघे राहणार रवीनगर, जुना कौठा) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक पिस्तूल, काही जीवंत काडतूस, मोबाईल आणि दुचाकी असा ऐवज जप्त केला आहे. या दोघांना भाग्यनगर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. पोलीस निरीक्षक सुधाकर आडे यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात रवी ठाकूर आणि आनंद यादव यांच्यासह इतर तीन जणांविरुद्ध दरोडा टाकण्याचा प्रयत्न व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सुशांत किनगे करत आहेत.